■ वर्ष-०७ ■ अंक-२२ ■ मुंबई, मंगळवार २० ते २६ एप्रिल २०२१ ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2 करोनामुळे 'त्या' व्यापाऱ्यांना अटकेपासून संरक्षण

3 → तडीपार गुंडाला पकडण्यासाठी गेले पोलीस, PSI वर कोयत्याने हल्ला

लाल रंगातील वाहनांसाठी 'विशेष मार्गिका' ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## पालिकेचे 201 कर्मचारी मृत्युमुखी



मुंबई : मुंबई महापालिके तील विविध विभागांतील तब्बल सहा हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना आतापर्यंत करोनाची बाधा झाली असून २०१ कर्मचाऱ्यांचा बळी गेला आहे. यापैकी चौघांचा मृत्यू जानेवारीनंतर झाला आहे. मृत आणि बाधितांमध्ये आरोग्य

...पान २ वर...

## पुढील पाच दिवसांत राज्याला प्राणवायू



राज्यातील करोनाबाधितांवर उपचार करताना प्राणवायूचा तुटवडा भासू नये आणि तो पुरेशा

...पान २ वर...

# राज्यातील लॉकडाऊन वाढणार; मुख्यमंत्री काय निर्णय घेणार?



मुंबईः राज्यात करोना रुग्णसंख्येनं पुन्हा एकदा उचल खाललली आहे. त्यापार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३० एप्रिलपर्यंत संचारबंदी लागू केली आहे. मात्र, तरीही राज्यातील करोना रुग्णसंख्या आटोक्यात येत नसल्याचं चित्र आहे. त्यामुळं राज्य सरकार पुन्हा एकदा कठोर लॉकडाऊन करण्याचा विचार करत असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तसे संकेतही आघाडीच्या मंत्र्यांनी दोन दिवसांपूर्वी दिले होते. यासंबंधी चर्चा करण्यासाठी आज मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाची आज ३. ३० वाजता महत्त्वाची बैठक होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ब्रेक द चेन अंतर्गत निर्बंधांबाबत नाराजी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडेही त्यांनी नाराजी बोलून दाखवली आहे, असं सांगण्यात येत

## राज्यातील लॉकडाऊन वाढ□ार?

**राज्यातील वाढत्या करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सध्या लागू करण्यात आलेले निर्बंध पुरेसे नसून, आणखी कडक लॉकडाउन लागू करण्याचा विचार सुरु आहे, असे संकेत विजय वडेट्टीवार यांनी दिले होते. तसंच, मुख्यमंत्री लवकरच निर्णय घेतील असंही ते म्हणाले होते.**

आहे. सध्याच्या नियमावलीत बदल करुन अधिक कठोर नियम करण्याची आवश्यकता असल्याचं, मत पवारांनी मांडलं असल्याचं समजते.

गर्दी नियंत्रणासाठी राज्य सरकारचा निर्णय करोनाची साखळी तोडण्यासाठी कडक निर्बंध लागू केले असतानाही किराणा दुकानात खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन या दुकांनाना सकाळी सात ते ११ या वेळेतच खुली ठेवण्याची मुभा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

विजय वडेट्टीवार यांचे संकेत करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यात सध्या लागू करण्यात आलेले निर्बंध पुरेसे नसून आणखी कडक लॉकडाऊन लागू करण्यावर विचार सुरू असल्याचे मदत आणि पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. सध्या ३० एप्रिलपर्यंत संचारबंदी करण्यात आली असली तरी निर्बंधाची मर्यादा आणखी वाढवली जाण्याची शक्यता असून याबाबत मुख्यमंत्री काही दिवसांत निर्णय घेतील, अस संकेत त्यांनी दिले होते.

## स्टिकरचा गैरवापर करणाऱ्यांवर गुन्हा



कठोर निर्बंध लागू झाल्यानंतरही मुंबईतील वाहनांची पूर्वीइतकीच रहदारी सुरू आहे. शहरातील काही भागांत नित्यनेमाने वाहतूक कोंडीही होत आहे. अनावश्यक किंवा परवानगी नसताना प्रवास करणाऱ्यांना आवरण्यासाठी पोलिसांनी रंगीत पास योजना सुरू केली आहे. त्या योजनेबाबत अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, दुकानदारांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यानिमित्ताने मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील यांच्याशी केलेली बातचीत.

* वाहनांसाठी 'कलर कोडिंग' सुरू करण्यामागील हेतू काय?

कठोर निर्बंधांमध्येही वाहने मोठ्या संख्येने रस्त्यांवर उतरली. प्रत्येक वाहन तपासून पुढे सोडणे निव्वळ अशक्य होते. वाहनांच्या गर्दीत अत्यावश्यक सेवा विशेषत: आरोग्य सेवेतील डॉक्टर, रुग्णवाहिका, वैद्यकीय उपकरणे, प्राणवायू वाहून आणणाऱ्या वाहनांचा खोळंबा होऊ लागला. हे लक्षात आल्यावर प्रवासास मुभा असलेल्या सेवांची तीन रंगांमध्ये वर्गवारी करण्याची कल्पना पुढे आली. ही योजना सुरू होताच रस्त्यांवरून सुमारे ४० टक्के वाहनांची रहदारी कमी झाली. लाल, हिरवा

...पान २ वर...

## बनावट निगेटिव्ह सर्टिफीकेट बनवणारे आरोपी सुसाट लोकांचा आधार कार्ड वापरुन त्याची फसवणूक

गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एस.आर.एल. लॅब, मिरारोड स्टेशन येथे काम करणारा कृष्णा सरोज हा इसम १०००/- रुपयांचे बदल्यात त्यास लोकांच्या आधारकार्डचा फोटो पाठविल्यानंतर कोणत्याही प्रकारे स्वब न घेता व कोणतीही टेस्ट न करता त्याचे कोवीड-१९ हया आजाराचे बनावट निगेटिव्ह सर्टिफीकेट देत आहे. सदर बातमीची माहीती पोलीस निरीक्षक श्री अविराज कुराडे यांनी वरीष्ठांना कळवुन सदर बातमीच्या अनुशंगाने कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश प्राप्त केले.आरोपी नामे कृष्णा रामदुलार सरोज,

वय २६ वर्षे, व्यवसाय-लॅब टेक्नीशियन, रा. कांदीवली पश्चिम मुळ रा. उत्तरप्रदेश हा लोकांचे कोणत्याही प्रकारचे स्वंब न घेता व चाचणी न करता, प्रत्येकी १०००/- रुपयांचे बदल्यात लोकांच्या आधारकार्डचा फोटो पाठविल्यानंतर त्याचे बनावट "कोवीड-१९" हया आजाराचे खोटे निगेटिव्ह सर्टिफीकेट तयार करुन देत असल्याच्या मिळालेल्या बातमी प्रमाणे बोगस गि-हाईक याचे मोबाईल फोन वरुन कोवीड-१९ या आजाराने वेगवेगळया दवाखान्यात ॲडमीट असलेल्या व रेमडीसिव्हर सारखी इंजेक्शन घेत असलेल्या ५ पेशंटची व बोगस गि-हाईक अशा एकुण ६ लोकांची नावे व आधार कार्डचे फोटो पाठवुन दिले. चार तासांनी वरील ६ लोंकाचे कोवीड-



१९ आजाराचे निगेटीव्ह सर्टिफीकेट बनवुन त्याचे मोबदल्यात रोख रक्कम ६,०००/- स्विकारत असतांना सदर इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात सखोल विचारपुस केली असता, तो कोणत्याही प्रकारे स्वब न घेता तसेच कोणतीही चाचणी न करता पैशाच्या मोबदल्यात खोटे कोवीड-१९ आजारा निगेटिव्ह सर्टिफीकेट बनवुन देत असल्याचे आले आहे. त्याचे कडुन एस.आर.एल. डायग्नोस्टीक नाव असलेली कोबीड-१९ आजारोची निगेटीव्ह ०६ सटौफिकेट व एक मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे,

त्याचेबर नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजो.नं. 1 २९० २०२१ भा.द.वि.स कलम ४६५,४६८,४७१, प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.सदरची कामगीरी मा.श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे). मा. श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अबिराज कुराडे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे. पो.हवा./३६ संदीप शिंदे, आणि पथक यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास नयानगर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

## सायबर क्राईमचे गुन्हे पून्हा उघडकीस ; क्रेडीट कार्डचा गैरवापर करुन भारतीय आणि परदेशी नागरिकांची फसवणूक करणारी टोळी सुसाट




भारतीय व परदेशी नागरीकांच्या क्रेडीट कार्डची माहिती चोरुन विमान तिकीटे व पंचतारांकीत हॉटेल बुकींग करुन फसवणुक करणा-या टोळीला सायबर गुन्हे शाखेकडुन करण्यात आली अटक. सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी श्री.प्रविण स्वामी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन अशी बातमी मिळाली कि, आरोपी समीर कासीम शेख हा त्याने भाडेतत्वावर मिरारोड येथे रुम घेवुन त्याचे साथीदारांसोबत भारतीय तसेच परदेशी नागरीकांच्या क्रेडिट/डेबिट कार्डाची माहिती घेवुन तसेच नागरीकांचे बनावट आधारकार्ड व इतर कागदपत्रे बनवुन त्याद्वारे विमान तिकीटे व पंचतारांकीत हॉटेल बुकिंग करुन ती तिकीटे इतर ट्रॅव्हल्स एजंटना कमी

...पान २ वर...

## मुंबईत चोरीच्या संशयावरुन तरुणाची हत्या




मुंबई, वरळी येथील खाऊगल्ली परिसरात मोबाइलचोरीच्या संशयावरून जमावाने केलेल्या मारहाणीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. वरळी पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली असून यामध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे. मृत तरुणाची ओळख अद्याप पटलेली नाही. वरळी दूरदर्शनजवळील खाऊगल्लीमध्ये एक तरुण बेशुद्धावस्थेत पडल्याची माहिती वरळी पोलिसांनी मिळाली. वरळी पोलिसांचे पथक या ठिकाणी पोहोचले आणि या तरुणाला रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले तसेच, त्याचा मृत्यू मारहाणीत झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला. यानंतर पोलिसांनी या परिसरातील सीसीटीव्ही फूटेज तपासले असता चार ते पाच जण मिळून या तरुणाला लोखंडी रॉडच्या सहाय्याने मारहाण करीत असल्याचे दिसले. कसून चौकशी केली असता सद्दाम शहा, रवीकुमार गौतम व एका अल्पवयीन मुलाने या गुन्ह्याची कबुली दिली.



# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, २० ते २६ एप्रिल २०२१


## धक्कादायक! टारगट तरुणांच्या छेडखानीला कंटाळून तरुणीची आत्महत्या



जळगाव, जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात असलेल्या खेरडे तांडा येथिल तरुणीने टारगट तरुणांच्या छेडखानीला कंटाळून विषारी पदार्थ प्राशन करुन आत्महत्या केली आहे. या धक्कादायक घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मागील पंधरा दिवसांपासून घरासमोर येऊन इशारे करुन मानसिक त्रास देणाऱ्या तिघा तरुणांच्या जाचाला कंटाळून १६ वर्षीय तरुणीने विषारी द्रव्य सेवन करुन आत्महत्या केल्याप्रकरणी या प्रकरणी गावातील तिघा संशयित तरुणांच्या विरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. खेरडे तांडा येथील १६ वर्षीय तरुणी घरात एकटी राहत होती. घरातील तिचे एकटेपण साधत गावातील टारगट मुलांनी नाव घेण्यास सुरवात केली. रोज तरूणीच्या घरासमोर येवून उभे रहायचे आणि इशारे करायचे. त्यांचा त्रास इतका वाढला की तरूणीने टोकाचे पाऊल उचलले.गावातील संशयित विशाल एकनाथ जाधव, विलास पुरनदास चव्हाण व पप्पू चरणदास चव्हाण हे तिघे गेल्या १५ दिवसांपासून त्रास देत होते. तिच्या घरासमोर जाऊन तिला इशारे करायचे.

या प्रकारामुळे तरुणी व्यथित झाली होती. तिघा तरूणांकडून होणाऱ्या या जाचाला कंटाळून तरुणीने राहत्या घरी मोनोसील हे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. याप्रकरणी तरुणीच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या विशाल जाधव, विलास चव्हाण व पप्पू चव्हाण या तिघा संशयितांच्या विरोधात गोरख राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संपत आहेर करीत आहेत.

## करोनामुळे 'त्या' व्यापाऱ्यांना अटकेपासून संरक्षण



मुंबई : जीएसटी करचुकवेगिरीच्या संशयाखाली सुरू केलेल्या चौकशीअंतर्गत वारंवार समन्स बजावण्यात आल्याने अटकेची भीती असल्याने मुंबई व परिसरातील आठ व्यापाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने त्यांना अटकेपासून तात्पुरते संरक्षण दिले आहे. गुजरातमधील केंद्रीय जीएसटी आयुक्तांच्या कार्यालयातील करचुकवेगिरी प्रतिबंधक कक्षाने ही कार्यवाही सुरू केली असल्याने तेथील संबंधित वैधानिक मंचासमोर दाद मागण्याची संधी मिळावी, या उद्देशाने या व्यापाऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

न्या. प्रकाश नाईक यांनी या व्यापाऱ्यांच्या अर्जांचा विचार केल्यानंतर अर्जदारांना अटक झाल्यास प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्या रकमेच्या हमीदारांवर त्यांची सुटका करावी, असा आदेश नुकताच काढला. तसेच कथित करचुकवेगिरीच्या प्रकरणांतील तपशीलांचा न्यायालयाने विचार केलेला नसून, सध्याची करोनाची परिस्थिती लक्षात घेता अर्जदारांना संबंधित मंचासमोर दाद मागता यावी एवढ्याच कारणाखाली १३ मेपर्यंत तात्पुरते संरक्षण दिले असल्याचेही न्या. नाईक यांनी आदेशात स्पष्ट केले.

नियमांचे उल्लंघन करून करचुकवेगिरी झाल्याच्या संदर्भात चौकशी सुरू आहे. यासंदर्भातील वस्तुजन्य माहिती व कागदपत्रे तुमच्याकडे असल्याबद्दल तपास अधिकाऱ्याला विश्वास आहे, असे सांगून प्रतिबंधक कक्षाने मार्च व एप्रिल महिन्यात मुंबई व परिसरातील वेगवेगळ्या आठ व्यापाऱ्यांना अनेकदा समन्स पाठवले आणि चौकशीसाठी बोलावले. त्या पार्श्वभूमीवर, 'समन्स वारंवार बजावले असल्याने चौकशीदरम्यान आम्हाला अटक होण्याची भीती आहे. त्यामुळे गुजरातमधील संबंधित वैधानिक मंचासमोर दाद मागण्याची संधी मिळेपर्यंत आम्हाला ट्रान्झिट अटकपूर्व जामीन द्यावा', अशी विनंती प्रतीक पटेल, हार्दिक गांधी, पुलकित मेहता, हितेंद्र पनसुरिया, रितेश परमार, धवल छाया, विनोद वधैया व अमित लिंबासिया यांनी वेगवेगळ्या वकिलांमार्फत अर्ज दाखल करून केली होती. त्यांचा विचार करून सद्यस्थिती लक्षात घेत न्यायाधीशांनी अर्जदार व्यापाऱ्यांना तात्पुरता दिलासा दिला.

## बाहेर संचारबंदी, हॉटेलच्या आत सुरु होता लाखोंचा सट्टाबाजार; पोलीस धडकले अन्

अमरावती: जिल्ह्यात संचारबंदी लागू असताना, एका हॉटेलमध्ये खोलीत आयपीएल सामन्यांवर लाखोंचा सट्टा लावला जात होता. याची माहिती मिळताच, पोलिसांनी धडक कारवाई केली. ७ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गेल्या आठ दिवसांतील ही दुसरी मोठी कारवाई आहे.

अमरावती शहर हद्दीमध्ये गस्तीवर असताना, बडनेरा-अकोला रस्त्यावरील हॉटेलातील खोली क्रमांक २०७ मध्ये काही सट्टेबाज कोलकाता विरुद्ध बंगळुरू या आयपीएलमधील सामन्यावर मोबाइलद्वारे सट्टा घेत होते, अशी माहिती खबऱ्यांकडून मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

या कारवाईत कैलास संजय बसंतवानी (वय २५ रा. सिद्धी कॅम्प कॉलनी, वाशिम) जितेंद्र रामचंद्र धामानी (वय ३७, रा. आययुडीपी कॉलनी, वाशिम, देवेश रामप्रसाद तिवारी (वय ३८, रा. वाशिम) व आशिष रमेशचंद्र सामानी (वय ३२, रा. अकोला नाका, वाशिम) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १९ हजार ८०० रुपये, विविध कंपन्यांचे सुमारे ६१ हजार रुपये किंमतीचे दहा मोबाइल हॅण्डसेट, एक कार, एक एलसीडी टीव्हीसह इतर वस्तू असा एकूण ७ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कैलास पुंडकर यांच्या नेतृत्वाखाली राजकिरण येवले, राजेश राठोड, अजय मिश्रा, निलेश जुनघरे, गजानन ढेवले, चेतन कराळे यांनी ही कारवाई केली.

## शहरबात-नावालाच चौथी मुंबई



मुंबईच्या धर्तीवर विविध सुविधा असलेली गृहसंकुले उभी राहात असल्याने आणि मुंबईचा मध्यमवर्ग स्थलांतरित होत असल्याने उपनगरीय रेल्वे मार्गाने कल्याणपल्याड असलेल्या अंबरनाथ आणि बदलापूर शहरांना गेल्या काही वर्षांत चौथी मुंबई म्हणून संबोधले जाऊ लागले. मात्र खरी मुंबई चालवणाऱ्या नोकरदारांच्या जिवावर उभ्या राहणाऱ्या या चौथ्या मुंबईच्या तोंडाला आरोग्य सुविधेच्या नावाने पाने पुसल्याचा प्रकार करोनाच्या निमित्ताने समोर आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लेखी विकास म्हणजे रस्ते, तर लोकप्रतिनिधींच्या गावी आरोग्य हा विषयच नसल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले. त्यामुळे ही शहरे फक्त नावालाच चौथी मुंबई म्हणून संबोधली जात असल्याचे दिसते आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि डोंबिवली-कल्याण या शहरांची नागरिकांना सामावून घेण्याची क्षमता जवळपास संपल्याने आणि मध्यमवर्गीयांच्या हाताबाहेर गेलेल्या घरांच्या किमतींमुळे गेल्या काही वर्षांत कल्याणपल्याड असलेल्या अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांमध्ये स्थलांतरण वाढले. मुंबई, नवी मुंबई, ठाणे महापालिका, मंत्रालय, मुंबईतील विविध महत्त्वाची शासकीय कार्यालये, रेल्वे सेवा अशा शासकीय सेवांमध्ये कार्यरत असलेले अनेक अधिकारी, कर्मचारी, वैद्यकीय कर्मचारी, निवृत्त सेवक तसेच कलाकार, खेळाडू गेल्या काही वर्षांत अंबरनाथ आणि बदलापूर शहरांकडे वळाले. खऱ्या अर्थाने मुंबई चालवणारा वर्ग या शहरांमध्ये स्थलांतरित झाल्याने राजकीय नेते आणि बांधकाम व्यावसायिकांनी या शहरांना चौथी मुंबई म्हणून संबोधण्यास सुरुवात केली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात या शहरांचा समावेश झाल्याने रस्ते आणि दळणवळणाच्या विविध वाहतूक प्रकल्पांना येथे मंजुरी देण्यात आली. इतकेच काय तर डोंबिवली-अंबरनाथ- बदलापूर या मेट्रो मार्गालाही तत्त्वत: मंजुरी देण्यात आली आहे. शहरांच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्याचा समज झाल्याने लोकप्रतिनिधींचे लक्ष कलाशून्य कलादालने, दिशादर्शक कमानी, प्रवेशद्वार, चौक सुशोभीकरण, स्मारके आणि पुतळ्यांकडे वळले आहे. मात्र करोनाच्या काळात या शहरांमध्ये आरोग्याच्या सुविधा किती तोकडय़ा आहेत हेही खऱ्या अर्थाने सिद्ध झाले आहे. आज अंबरनाथ आणि बदलापूर शहरात करोना रुग्णांसाठी एकही अतिदक्षता विभागाची खाट किंवा व्हेंटिलेटरची सुविधा शिल्लक नाही. गेल्या काही आठवडय़ांपासून पालिकांचे प्रशासन प्राणवायूसाठी धावपळ करत आहे. साध्या साध्या औषधांसाठी थेट जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांच्या दारात जाण्याची वेळ या दिवसांत आली आहे. इतकी भयाण परिस्थिती असताना या दोन्ही शहरांना दिलेला चौथ्या मुंबईचा दर्जा हा नावालाच असल्याचे दिसते आहे. करोनाचा शिरकाव अंबरनाथ आणि बदलापूर शहरांत जरा उशिरानेच झाला. त्या वेळी अंबरनाथ शहरात मृत्युशय्येवर असलेले आणि पालिकेने आपल्यापासून सुटका करून राज्य शासनाच्या हाती सुपूर्द केलेले उपजिल्हा रुग्णालय होते. तर बदलापूर शहरात कुळगाव बदलापूर नगरपालिकेत बाह्य़रुग्ण विभाग आणि लहानग्यांचे लसीकरण करणारे कै. शिवबाबा दुबे रुग्णालय अस्तित्वात होते. ग्रामीण भागाचा भार वाहणारे उपजिल्हा रुग्णालय दर्जाचे ग्रामीण रुग्णालयही शहराच्या वेशीवर होतेच. मात्र त्याचा शहराला उपयोग फक्त अपघात, गुन्ह्य़ांतील मृत व्यक्तींच्या प्राथमिक तपासणीपुरताच मर्यादित होता. त्याखेरीज दोन्ही शहरांमध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतकी खासगी रुग्णालये होती.

## पत्नीसह मुलीला मारहाण आणि शिवीगाळ, वकील पतीसह मित्रावर गुन्हा

सातारा: पत्नी आणि मुलीला मारहाण आणि शिवीगाळ करणाऱ्या वकील पती आणि त्याच्या मित्राविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा शहराजवळील गोडोली येथे ही घटना घडली आहे.

या प्रकरणी सातारा शहर पोलीस अधिक तपास करत आहेत. राजेश निकम आणि अमोल कुलकर्णी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर दोघेही आरोपी फरार झाले आहेत. सातारा शहर पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोडोली येथे एक उच्चशिक्षित महिला तिच्या मुलीसमवेत राहते. राजेश आनंदराव निकम (रा. रमाकांत टॉवर, यादोगोपाळ पेठ, सातारा) हे त्यांचे पती आहेत. दरम्यान, संशयित राजेश निकम आणि त्यांचा मित्र अमोल कुलकर्णी हे दोघे जण महिलेच्या गोडोलीतील घरी गेले.

## करोनाकाळात अनाथांचा जीवनसंघर्ष खडतर



जन्मापासूनच रक्ताच्या नात्यांना मुकलेल्या अनाथांचा जीवनसंघर्ष करोनाकाळात अधिकच बिकट बनला आहे. टाळेबंदीमुळे रोजगार मिळविणे अवघड बनल्याने अनाथालयातून बाहेर पडून आयुष्याला आकार देण्याची अनेकांची स्वप्ने धुळीस मिळत आहेत. कित्येक मुलांचा जगण्याचा संघर्ष तीव्र झाला असून, स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी धडपड करणाऱ्या या तरुणांना सरकारने आधार द्यावा, अशी मागणी होत आहे.

महिला व बालविकास विभागाअंतर्गत चालणाऱ्या बालगृहात अनाथ मुलांना १८ वर्षांपर्यंतच ठेवले जाते. त्यानंतर यातील काही मुले २१ वयापर्यंत अनुरक्षणगृहात राहू शकतात. अनुरक्षणगृहात या तरुणांना निवास, जेवण आणि शिक्षणासाठी सरकारी मदत मिळते. मात्र, त्यातील अनेकजण अनुरक्षणगृहात दाखल होत नाहीत. त्यामुळे या मुलांचा सरकारी यंत्रणेशी संपर्क तुटतो. काहीजण हॉटेलमध्ये काम करतात, तर काही मिळेल त्या मार्गाने उदरनिर्वाह करतात. मात्र, करोनाकाळात त्यांची स्थिती बिकट बनली आहे.


## पृष्ठ १ वरुन


### पालिकेचे 201 कर्मचारी मृत्युमुखी

विभागातील कर्मचाऱ्यांबरोबरच सफाई कर्मचारी आणि अन्य विभागांतील कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. आतापर्यंत केंद्र सरकारने के वळ १७, तर पालिके ने ६७ मृत कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाईची रक्कम दिली आहे. मुंबईत करोनाचा कहर झाल्यापासून आणि आता मुंबईत करोनाची दुसरी लाट आल्यानंतर पालिके च्या आरोग्य विभागासह विविध विभागातील कर्मचारी बाधित झाले आहेत. तर मोठय़ा संख्येने कर्मचाऱ्यांचा बळी गेला आहे. पालिके ने आतापर्यंत एक उपायुक्त व एक सहाय्यक आयुक्तही करोनाच्या संसर्गामुळे गमावले आहेत. आता फेब्रुवारीपासून करोनाची दुसरी लाट आल्यानंतरही अनेक कर्मचारी मोठय़ा संख्येने बाधित होत आहेत. करोनाशी सामना करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या नातेवाईकांना केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत ५० लाख रुपयांची नुकसानभरपाई दिली जाते. त्याअंतर्गत केंद्र सरकारने पालिके च्या के वळ १७ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाईची रक्कम दिली आहे, तर उर्वरित अर्जाची छाननी करून त्यांना पालिके तर्फे मदत दिली जात आहे. आतापर्यंत पालिके ने ६७ मृत कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५० लाखाची नुकसानभरपाई दिली आहे. अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या वर्षभरापासून आतापर्यंत सहा हजाराहून अधिक कर्मचारी बाधित झाले आहेत. सप्टेंबरपर्यंत अडीच हजार कर्मचारी बाधित झाले होते.

### पुढील पाच दिवसांत राज्याला प्राणवायू

प्रमाणात उपलब्ध व्हावा याकरिता रेल्वेची ‘ऑक्सिजन एक्सप्रेस’ सोमवारी विशाखापट्टणमच्या दिशेने रवाना झाली. राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांनी हिरवा कंदील दाखविल्यानंतर ही विशेष गाडी कळंबोली येथील माल धक्क्यावरून विशाखापट्टणमला रवाना झाली. सात टँकर घेऊन गेलेल्या या ‘ऑक्सिजन एक्सप्रेस’मधून सुमारे १०० मेट्रिक टन द्रवरूप वैद्यकीय प्राणवायू आणला जाणार आहे. राज्यातील प्राणवायूचा तुटवडा दूर करण्यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. त्यामुळेच सरकारने द्रवरूप वैद्यकीय प्राणवायू (लिक्विड मेडिकल ऑक्सिजन) रेल्वेने नेता येऊ शकेल का याची विचारणा रेल्वेकडे केली होती. त्याला प्रतिसाद देऊन मध्य रेल्वेने कळंबोली ते विशाखापट्टणम, जमशेदपूर, रुरकेला आणि बोकारो असा सुलभ मार्ग (ग्रीन कॉरिडॉर) तयार केला आहे. कळंबोली येथून सोमवारी (१९ एप्रिल) विशाखापट्टणमच्या दिशेने पहिली ऑक्सिजन एक्सप्रेस रवाना झाली आहे. ही एक्सप्रेस सात टँकरमधून प्राणवायू भरून घेऊन राज्यात परतेल. पुढील पाच दिवसांत ही रेल्वे प्राणवायूने भरलेले टँकर घेऊन येईल, अशी माहिती परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांनी दिली.

समतल (फ्लट) वॅगनवर ठेवलेल्या रोड टँकरसह ‘रोल ऑन रोल ऑफ‘ (रो रो) सेवेद्वारे द्रवरूप वैद्यकीय प्राणवायूची वाहतूक केली जाणार आहे. पुलांवरील रस्ते आणि ओव्हर हेड यंत्रणेमुळे रेल्वे वॅगनवर टँकर एका विशिष्ट उंचीचे टँकर ठेवावे लागणार होते. त्यामुळे या मर्यादित उंचीचे टँकर मिळवण्यासाठी परिवहन विभागातील अधिकाऱ्यांची सोमवारी दिवसभर धावपळ सुरू होती. टँकर ओव्हरहेड वायर आणि बोगदे लागणार नाहीत यासाठी मध्य रेल्वेचे कर्मचारी खबरदारी बाळगत होते. तसेच मध्य रेल्वेच्या

### सायबर क्राईमचे गुन्हे पून्हा उघडकीस

किमतीत विकत आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने वरीष्ठांची परवानगी घेवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम सेल व मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी छापा टाकुन आरोपीतांकडुन दोन लॅपटॉप, १४ मोबाईल, ५५ सिमकार्ड, २५ बनावट आधारकार्ड, ११ चेकबुक, १३ क्रेडीट/डेबिट कार्ड व क्रेडीट/डेबिट कार्डाची माहिती लिहलेल्या २४ वहया, असा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे. सदरबाबत काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी समीर शेख यांचेवर यापूर्वी किंगफिशर कंपनीला तसेच अन्य कंपन्यांना फसविलेबाबतचे एकूण चार गुन्हे दाखल आहेत. गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवून श्री सदानंद दाते, मा.पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी श्री.रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त यांच्या अधिपत्याखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली. विशेष तपास पथकाकडून केलेल्या तपासात सन २०१८ पासुन आरोपीत सामीर शेख हा काही व्यक्तीकडून क्रेडिट कार्डचा डेटा गैरमार्गाने प्राप्त करुन तसेच इतरांचे नावे मोबाईल सिमकार्ड घेवुन क्रेडीट कार्डाच्या डेटाचा उपयोग करुन अंतराष्ट्रीय व अंतरदेशीय विमान तिकीटे व बनावट आधारकाव्दिरे पंचतारांकीत हॉटेल बुकींग करुन कमी किमतीमध्ये ग्राहकांना विकत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.विमानाची तिकीटे बुकींग करण्यासाठी मोबाईल सिमकार्ड विक्रेता याचे मदतीने ग्राहकांच्या संमतीशिवाय त्यांचे आधारकार्डाचा वापर करुन मोबाईलचे सिमकार्ड मिळवुन वापर केल्याचे तसेच इतर अटक व पाहिजे आरोपीत यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत समीर शेख यास गैरमार्गाने केडीट कार्डाचा डेटा पुरविणे व विमानाची तिकीटे स्वतःच्या फायदयासाठी बुकींग करण्यासाठी मदत केल्याचे निष्पन्न झाले आहे.समीर शेख कडुन जप्त करण्यात आलेल्या वहयामध्ये भारतीय व परदेशी बँकेचे ४७१८ क्रेडीट कार्डचा डेटा मिळुन आला असुन त्याचा त्याने वापर करुन विमान व हॉटेलची तिकीटे बुक केली आहेत. त्याच्या मोबाईल व हार्डडिस्कमध्ये सुमारे १००० पेक्षा जास्त अंतरराष्ट्रीय व अंतरदेशीय विमानाची तिकीटे तसेच पंचतारांकीत हॉटेल बुकींग केल्याचे दिसुन आले असुन आरोपीला महाराष्ट्र व इतर राज्यातील ट्रॅव्हल एजंट मदत करत असल्याने त्यामधील १) वसीम कासीम शेख रा. मुंब्रा २) अब्दुल हमीद अब्दुल रहिम बाशा शेख रा. मुंब्रा जि.ठाणे. ३) ईस्माईल अशरफ काझी रा. मुंब्रा जि.ठाणे यांना अटक करण्यात आली आहे.समीर कासीम शेखला क्रेडीट कार्ड्सचा डेटा पुरविणारा इसम स्टीफन फ्रान्सीस डिसोजा रा. मिरारोड हा मालाड येथील कॉलसेंटर येथे कामाला आहे. तो तेथील युके व अमेरीकेतील शॉपींगसाठी कॉल करणा-या कस्टमरचा डेटा घेवुन तो समीर याला पुरवीत असल्याने त्याला मिरारोड येथुन अटक करण्यात आली आहे. तसेच अमेय अरुण लोकरे हा बिटकॉईनद्वारे डार्कनेटवर जावुन डेटा खरेदी करुन पुरवीत असल्याचे समीर याने सांगितल्यावरुन त्यास जयपुर येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे. गुन्हयातील अटक सर्व ६ आरोपीतांकडे विचारपुस केली असता अशाच प्रकारचे गुन्हे केले असल्याने अदयाप पावेतो त्यांचेविरुध्द वेगवेगळया ५ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.सदरची कामगिरी श्री सदानंद दाते, मा.पोलीस आयुक्त, श्री एस जयकुमार, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.डॉ.महेश पाटील मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.रामचंद्र देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.जितेंद्र वनकोटी,वरीष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती गुन्हे शाखा, श्री.सुजीतकुमार गुंजकर,सर्व नेम- मध्यवर्ती गुन्हे शाखा यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी हे करीत आहेत.

### स्टिकरचा गैरवापर

किंवा पिवळा स्टीकर नसलेली वाहने टिपून चौकशी, झाडाझडती घेणे सोपे झाले. दुसरे असे की प्रत्येक गाडी थांबवून व्यक्तिश: चौकशी केल्याने दोन्ही बाजूंनी संसर्ग प्रसाराचा धोका होता. तोही कमी झाला. * रंगीत स्टीकर कोण देणार? आणीबाणीच्या परिस्थितीत प्रवास करणे भाग पडल्यास कोणता स्टीकर लावावा? असे संभ्रम नागरिकांमध्ये कायम आहेत. हे स्टीकर घरच्या घरी तयार करता येतील. घरात या रंगाचा उपलब्ध कागदाचा वर्तुळ कापून घ्यावा आणि वाहनांच्या मागील व पुढच्या बाजूस चिकटवणे अपेक्षित आहे. मुळात ही व्यवस्था निर्बंधांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांच्या आणि अत्यावश्यक सेवेतील वाहनांच्या सोयीच्या दृष्टीने करण्यात आली आहे. हे स्टीकर वाहनांच्या नोंदणी क्र मांक पाटय़ांप्रमाणे प्रमाणित असावेत, ते पोलिसांकडूनच घ्यावेत, असे बंधन बिलकूल नाही. सर्वसामान्य नागरिक वैद्यकीय आणीबाणी किंवा अन्य अत्यावश्यक कारणांसाठी घराबाहेर पडल्यास, त्यांनी प्रवास केल्यास पोलीस कोणताही अडथळा आणणार नाहीत. प्रवासाच्या निमित्ताची खातरजमा झाल्यास कारवाईही केली जाणार नाही. रंगीत स्टीकर लावलेल्या वाहनांसाठी काही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे का? होय, लाल रंगाचा स्टीकर लावलेली वाहने महत्त्वाची असून त्यांना प्रवासात प्राधान्य देण्यासाठी ग्रीन कॉरिडॉरची व्यवस्था प्रायोगिक तत्त्वावर शहरातील काही मार्गावर करण्यात आली आहे.बाहेरून मुंबईत येणाऱ्या वाहनांनाही हे रंगीत स्टीकर लावावे लागतील? निश्चितच, कलर कोडिंगबाबतचे आदेश फौजदारी दंड संहितेतील कलम १४४ नुसार मुंबईच्या हद्दीत लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे अन्य शहरे, राज्यांतून मुंबईत येणाऱ्या वाहनांनी वर्गवारीनुसार हे रंगीत स्टीकर लावणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास या वाहनांचा, प्रवाशांचा खोळंबा होऊ शकेल. रंगीत स्टीकरचा गैरफायदा घेणारे कसे शोधाल?कोणी प्रवास करावा, करू नये याबाबत नियम जारी करण्यात आले आहेत. हे नियम पाळण्याची जबाबदारी नागरिकांवरही आहे. मुभा असलेल्या कोणत्याही वर्गात नसताना रंगीत स्टीकर लावून प्रवास करणाऱ्यांवर फसवणुकीसह अन्य कायद्यांनुसार गुन्हा नोंदवला जाणार आहे. रंगीत स्टीकर नसलेल्या वाहनांची चौकशी होईलच, पण स्टीकर असलेल्या वाहनांचीही अधूनमधून चौकशी करण्यात येईल.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, २० ते २६ एप्रिल २०२१



## संपादकीय...


# कोरोनाच्या मोठ्या प्रश्नाचे छोटे तुकडे केले तर?

कोरोना महामारीचे गांभीर्य अति प्रचंड असल्याने त्यावर टीकाटिप्पणी करण्याऐवजी सर्वांनी सहकार्य करावे, असा सूर असून तो योग्यच आहे. पहिल्या लाटेच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेच्या वेळेस तीन महत्वाची आयुधे आता अधिकची उपलब्ध आहेत : १- संसर्गाची लाट कशी थोपवायची, याचा अनुभव पहिल्या वेळी शासन-प्रशासनाच्या गाठी नव्हता तो आता आहे. २- हॉस्पिटल्स, बेड्स, व्हेंटिलेटर्स आदी साधनसामग्री आणि विशेषतः कोविड सेंटर्स हे इन्फ्रास्ट्रक्चर पहिल्या वेळेपेक्षा अधिक उपलब्ध आहे. ३- पहिल्या लाटेच्या वेळेस कोरोनावर कोणते औषध चालते, याबाबत अनभिज्ञता होती, ती आता बरीचशी कमी झालेली आहे. शिवाय लशींचा शोध लागून त्यायोगे या साथीच्या प्रतिबंधाचा मार्ग मोकळा झालेला आहे. ही दुसरी लाट ओसरेलही, पण मग युरोपियन देशासारखी तिसरी लाट येण्याची नामुष्की तरी आपणावर ओढावणार नाही त्यासाठी मी काही सुचवू इच्छितो. मी प्रशासकीय अधिकारी होतो हे खरेच, पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे असे प्रसंग हाताळण्याचा (कोरोनाच्या तुलनेत) मर्यादित का असेना अनुभव माझ्या गाठीशी आहे. साथ सुरू झाल्यापासून विविध व्यासपीठांवर मी हे मांडत आलो, शिवाय अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चाही करत आलो आहे. हा आणखी एक प्रयत्न : २००९ मध्ये भारतात आलेल्या स्वाईन फ्लूने पुण्यात आव्हान निर्माण केले होते. त्या वेळेस पुण्याचा महापालिका आयुक्त म्हणून साथ आटोक्यात आणण्याची जबाबदारी माझ्यावर होती. शिवाय नाशिक येथील कुंभमेळा व्यवस्थापन, खासगी क्षेत्रातील व्यवस्थापन इत्यादींच्या अनुभवावरून प्रत्यक्षपणे राबवून, तावून सुलाखून निघालेल्या उपाययोजनांचे अनुभव माझ्या गाठीशी आहेत. मुळात साथरोग हा उपचाराचा नव्हे, तर संसर्ग प्रतिबंध करण्याचा रोग आहे हे समजून प्रशासनाने रणनीती ठरवली पाहिजे. आता वेगळेच चित्र दिसते. लॉकडाऊन, मायक्रो कॅटोंन्मेंट झोन, इमारती सील करणे, कोविड सेंटर्स उभारणे, खासगी हॉस्पिटलमधील बेडस् ताब्यात घेणे अशा साथ वाढल्यानंतर उपाययोजनांवर प्रामुख्याने भर आहे. प्रशासनाचे ८०-९० टक्के प्रयत्न आणि साधनसंपत्ती ही साथ प्रतिबंधासाठी, तर उर्वरित दहा-वीस टक्के उपचाराकरिता वापरणे आवश्यक आहे. गेले वर्षभर अंमलबजावणी स्तरावर हे चित्र अगदी उलट दिसते आहे. प्रशासन किंवा कोणतेही शासन एपीआय भविष्यवेध, पूर्वतयारी आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर चालते. भविष्यवेध आणि पूर्वतयारी या दोन्ही बाबतीत आपण कमी पडलो. योग्य प्रकारचा मास्क कायमस्वरूपी निष्ठेने वापरणे, हाताची शास्त्रशुद्ध स्वच्छता आणि सामाजिक अंतर पाळणे या तीन गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी करण्यातही आपणास यश आले नाही. सध्याच्या दुसऱ्या लाटेवर मात करून तिसरी लाट येऊ नये, यासाठी मी पुढील मार्ग सुचवू इच्छितो : १) कोणताही जटिल प्रश्न शक्य तितक्या लहान स्वरूपात विभागल्यास हाताळणी सुकर होते. ग्रामपंचायती, नगरपालिका, महापालिकांना स्थानिक सरकारे म्हणून घटनेमध्ये मान्यता आहे. अत्यंत छोट्या भौगोलिक क्षेत्राकरिता एक तात्पुरते मायक्रो प्रशासकीय युनिट तात्पुरते निर्माण करण्यात येऊन त्यांच्यावर कोरोना प्रतिबंध ते उपचाराबाबत समन्वयाची जबाबदारी टाकण्याची ही वेळ आहे. केवळ आरोग्य विभागाचा नाही तर राज्यशासनातील सर्व कर्मचाऱ्यांचा या मायक्रो प्रशासकीय घटकांमध्ये समावेश करण्यात यावा. एक उदाहरण - पुणे महापालिकेमध्ये १६४ नगरसेवक, सुमारे २० हजार कर्मचारी आहेत. प्रशासन मुख्यालय आणि १५ वॉर्ड् ऑफिसमधून चालते व त्यांच्याकडे ४२ लाख लोकसंख्येची जबाबदारी आहे. पुण्याची ४२ लाख लोकसंख्या १६४ भौगोलिक क्षेत्रांमध्ये विभागली तर प्रत्येक क्षेत्रांमध्ये सर्वसाधारण २६ हजार इतकी व्यवस्थापनास लहान लोकसंख्या येईल. महापालिकेचे २० हजार कर्मचारी या १६४ युनिटस मध्ये विभागले तर १२० कर्मचारी त्याकरिता उपलब्ध होतील. १२० कर्मचाऱ्यांना २६ हजार लोकसंख्या मास्क, सामाजिक अंतर, स्वच्छता, ॲम्बुलन्सची सोय, बेड्सची उपलब्धता, औषधांचा पुरवठा इत्यादींबाबत अत्यंत प्रभावीपणे हाताळता येईल. त्यांना पोलिसांची जोड मिळाली तर अधिकोत्तम. २) सध्या लोकसहभाग अभावानेच दिसतो. हे मायक्रो प्रशासकीय युनिट तयार झाल्यास स्थानिक नागरिकांनाही मदतीला घेता येऊ शकेल. ३) हे मायक्रो युनिटसमध्ये 'कोरोना प्रतिबंध' ही संकल्पना स्पर्धेसारखी राबवता येईल आणि युनिट कंटेन्मेंट झोनमध्ये कसे येऊ द्यायचे नाही, याची जबाबदारी ते आपोआपच घेतील. ४) एखाद्या युनिटमध्ये संसर्ग वाढू लागला, तर वरिष्ठ पातळीवरून तत्क्षणी हस्तक्षेप करता येऊ शकेल.५) सर्वच राजकीय पक्ष निवडणुकांच्या वेळेस बूथ कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करतात, या कार्यकर्त्यांची मदत घेता येईल. ६) लसीकरण करिता बूथ स्तरावरील मतदारयादी घेऊन नागरिकांची माहिती दारोदारी जाऊन कोविन ॲपमध्ये अगोदरच लोकसहभागातून भरून घेतली तर लसीकरण केंद्रावर रांगा लावण्याची आवश्यकता राहणार नाही . ७) लॉकडाऊन करून सर्वच अर्थचक्र ठप्प करण्याऐवजी सर्व दुकानांना या योजनेच्या कक्षेत आणून दुकानातील कर्मचारी आणि ग्राहक मास्क, शारीरिक अंतर पाळतील, हे पाहता येईल.

# 'अर्था'वाचून उगीच नाही..

आर्थिक बाबतींत 'आमचे आम्ही' ही वृत्ती झेपणारी असती; तर विमा, संरक्षण उत्पादन क्षेत्रातील परकीय भांडवलाची मर्यादा वाढवण्याची वेळ आपणावर आली नसती. ती वाढवूनही अद्याप बडे गुंतवणूकदार आलेले नाहीत..

सध्याच्या करोनाकाळात दुर्लक्षिली गेलेली महत्त्वाची बातमी म्हणजे सिटिबँकेची भारतत्यागाची घोषणा. हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन (एचएसबीसी), ग्रिंडलेज, डॉएचे, डेव्हलपमेंट बँक ऑफ सिंगापूर (डीबीएस) आदी परदेशी बडय़ा बँकांच्या मालिकेत सिटिबँक म्हणजे या क्षेत्राचा मेरुमणी. अमेरिकी बाजाराधारित भांडवलशाहीचे दिमाखदार प्रारूप म्हणजे सिटिबँक. अमेरिका असो वा इंग्लंड वा जर्मनी. या बडय़ा संपन्न देशांचा दिमाख त्यांच्या बँकांचा आकार आणि उद्योगातून समजून घेता येतो. या बँकांचा तोरा काही औरच. या बँकांतील खाते, त्यांचे क्रेडिट कार्ड आदी सेवा देशातील लब्धप्रतिष्ठित आणि उच्चभ्रूंसाठी स्थानमाहात्म्य निर्देशांक होत्या. जागतिक प्रगती आणि संपत्तीनिर्मितीचा रोमांचक इतिहास समजून घ्यायचा असेल तर मार्कुस गोल्डमन आणि सॅम्युअल सॅक या द्वयीचे उद्योग, जे. पी. मॉर्गन आणि हेन्री स्टॅन्ले यांचे अमेरिकी फेडच्याही आधी बँक स्थापन करणे, जर्मनीच्या 'डॉएचे बँक'ची महानता आणि अलीकडे डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली तिची दशा यावर अनेक उत्तमोत्तम पुस्तके लिहिली गेली ('लॉर्ड्स ऑफ फायनान्स', 'द फेड', 'पॉवर ऑफ मनी', 'पार्टनरशिप', 'ॲसेट ऑफ मनी' आदींच्या मालिकेतील ताजे 'डार्क टॉवर्स'). जगातील या अशा बलाढय़ बँकांच्या मालिकेतील एक सिटिबँक. आणखी दीड दशकानंतर या बँकेच्या स्थापनेस २२५ वर्षे पूर्ण होतील. आपला देश ईस्ट इंडिया कंपनीच्या अमलाखाली जायच्या आधी आणि पेशवाई शेवटच्या घटका मोजत असताना १८१२ साली या बँकेची स्थापना झाली. तिचे भारतातील आगमनही ११९ वर्षे जुने. तिथपासून शंभर वर्षांत सुमारे १२ लाख संस्थात्मक खाती, २९ लाख लहान ग्राहक आणि तब्बल २२ लाख क्रेडिट कार्डधारक इतका प्रचंड असा या बँकेचा भारतीय संसार. पण आता मात्र तो झेपत नाही, असे कारण पुढे करीत या बँकेने भारतातून गाशा गुंडाळण्याचा निर्णय जाहीर केला.




ऑस्ट्रेलिया, बहारीन, चीन, इंडोनेशिया, कोरिया, मलेशिया, फिलिपिन्स, पोलंड, रशिया, तैवान, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांतूनही सिटिबँकेने भारतासमवेत माघार घेतली. यातील चीन आणि ऑस्ट्रेलिया यांची तुलना करण्याचे कारण नाही. कारण या देशांचे बँकिंग क्षेत्र चांगलेच तगडे आहे. यातील चीनची सरकारी 'बँक ऑफ चायना' हिचा व्याप तर २५-२६ अशा समस्त भारतीय सरकारी बँकांचा घास घेऊ शकेल इतका बलाढय़. तेव्हा त्या देशातून आणि भारतातून सिटिबँकेने माघार घेणे यातील अर्थ मूलत: एक नाही. 'व्यवसाय विस्ताराचे आव्हान आणि चढी स्पर्धा' असे कारण सिटिबँक भारतातून माघार घेण्यामागे देते. ते खरेच. पण त्याच्या जोडीला 'नियामकांचे आव्हान' असेही एक कारण या बँकेतर्फे नमूद करण्यात आले आहे. या बँका एकेका देशाच्या अर्थसंकल्पाशी स्पर्धा करू शकतात इतक्या भव्य आहेत. त्या स्पर्धेतूनच मोठय़ा झाल्या. मुळात सिटिबँक ज्या देशातून येते तो देश, म्हणजे अमेरिका, हाच जीवघेण्या स्पर्धेसाठी ओळखला जातो. बळी तो कान पिळी हे तत्त्व त्या देशात पाळले जाते. त्यामुळे २००८ च्या आर्थिक संकटानंतर 'लेहमन ब्रदर्स'सारखी महाप्रचंड बँक गटांगळ्या खाऊ लागली असता तीस वाचवण्याचा प्रयत्न सरकारने केला नाही. ती बुडाली. याचा अर्थ त्या देशातही बँकांचे राजकारण नाही असे नाही. 'लेहमन ब्रदर्स' बुडत असताना त्याच वेळी 'गोल्डमन सॅक'ला मात्र सरकारने मदतीचा हात दिला. गोल्डमनचे माजी प्रमुख टिमोथी गेट्नर यांचे सरकारात असणे वगैरे कारणे यामागे आहेतच. पण तरीही त्या देशांतील बँकांना स्पर्धेचे बाळकडू जन्मत:च मिळालेले असते. वाघाची बछडी जशी चालता येऊ लागल्या लागल्या शिकारीलाच लागतात तद्वत या बँकांचा स्वभाव. तेव्हा भारत वा अन्य देशांतून पाय काढून घेण्यामागे वाढती स्पर्धा हेच कारण नसणार, हे लक्षात घ्यायला हवे. त्याच वेळी; या बँकांची आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीची सवय लक्षात घेता हेही लक्षात घ्यायला हवे की त्यांच्याकडून खऱ्या कारणांची कधीही वाच्यता केली जाणार नाही. त्यामुळे त्यांच्या वाच्यतेचा अर्थ हा समजून घ्यायला हवा.

'रेग्युलेटरी कॉस्ट्स' असा एक चतुर शब्दप्रयोग या संदर्भात केला गेला. 'नियामकाचा खर्च', 'नियमनाची किंमत' आदी त्याचा अर्थ. यात दोन मुद्दे आहेत. परदेशी बँकांना दोन पद्धतीने भारतात कामकाज करता येते. एक म्हणजे अन्य देशांप्रमाणेच मूळच्याच बँकेची शाखा भारतात काढणे. आणि दुसरा मार्ग म्हणजे भारतीय उपकंपनी स्थापन करून येथील व्याप वाढवणे. सिंगापूरच्या डीबीएस या बँकेने यातील दुसरा मार्ग निवडला तर सिटिबँक पहिल्या मार्गानेच भारतात व्यवसाय करीत राहिली. मार्ग कोणताही असो. या बँकांना भारतात व्यवसाय करताना काही नियम पाळावे लागतात. सरकारचे 'सामाजिक-आर्थिक उद्दिष्ट' पूर्ण करण्यासाठी हे नियम आहेत. म्हणजे सरकारने प्राधान्यक्रमाने निश्चित केलेल्या क्षेत्रांना कर्जे देणे, जनधन खाती इत्यादी. ही खाती सांभाळण्याचा खर्च हा त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक. हे सत्य सरकारी बँकाही मान्य करतात. पण त्यांना पळवाट नाही. एका अर्थी तळागाळातल्या नागरिकांपर्यंत बँकिंग सेवा नेता यावी यासाठी हे सर्व आवश्यक असल्याचे मान्य केले तरी बँकिंग क्षेत्रातील सरकारी हस्तक्षेप हा डोळ्यावर येणारा आहे. उदाहरणार्थ शाखाविस्तार. अजूनही त्यावर सरकारचे कडेकोट नियंत्रण आहे. वास्तविक आर्थिक विकासाच्या रणदुंदुभीचा गरज करत सत्तेवर आलेल्या सरकारने ही नियंत्रणे उठवायला हवीत. कोणत्या बँकेने कोठे शाखा सुरू वा बंद कराव्यात याबाबत बँकांचाच निर्णय अंतिम हवा. पण वास्तव तसे नाही. यामुळे परदेशी बँकांचा 'नियमन खर्च' वाढतो. सिटिबँकेने ते बोलून दाखवले आणि अधिक काही स्पष्टीकरण न देता भारतत्यागाचा निर्णय घेतला.

आता यावर आपल्याकडील अर्थसाक्षरतेचे मांद्य लक्षात घेता नेहमीची प्रतिक्रिया उमटेल. या प्रतिक्रिया ''बरे झाले, आता भारतीय बँकांना व्यवसायवाढ करता येईल'', ''कशाला ठेवायची या परदेशी बँकांची पत्रास'' येथपासून ते ''तुमच्या पोटात दुखण्याचे कारण काय'' येथपर्यंत अनेक प्रतिक्रिया व्यक्त होतील. पण सिटिबँकेच्या जाण्यातील यातील व्यापक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. 'केर्न्स एनर्जी'स भारतातून जावे वाटते, 'व्होडाफोन' तशी शक्यता चाचपडून पाहातो, अन्य अनेक वित्तसंस्था भारताविषयी असेच काहीसे मत व्यक्त करतात, यामागील कारणांचा विचार करायला हवा. याबाबत 'आमचे आम्ही' ही वृत्ती आपणास झेपणारी असती तर विमा, संरक्षण उत्पादन क्षेत्रातील परकीय भांडवलाची मर्यादा वाढवण्याची नामुष्की आपणावर आली नसती. ती वाढवूनही अद्याप कोणीही बडा गुंतवणूकदार या क्षेत्रांत आलेला नाही, यातून काय ते समजते. तेव्हा मुद्दा सिटिबँक वा तत्सम कोणाचे भारतातून जाणे इतकाच नाही. बरे, ही बँक तोटय़ात होती, असेही नाही. सांप्रत काळी चार हजार कोटी रुपयांहून अधिक इतका नफा या बँकेच्या खात्यात जमा आहे. तरीही तीस भारत सोडावासा वाटतो, यामागील अर्थ लक्षात आपण घेणार का, हा खरा यातील मुद्दा. तसे काही होण्याची शक्यता नाही, हे खरे असले तरी एक बाब काळ्या दगडावरची रेघ आहे. ती म्हणजे जागतिक बाजारात लक्षवेधी उपस्थिती असल्याखेरीज आज कोणताही देश महासत्तापदाच्या जवळपासदेखील पोहोचू शकत नाही. जागतिक बाजारात जाण्याची कोणत्याही देशाची क्षमता त्या देशात येऊ इच्छिणाऱ्यांकडून दिसून येते, हे सत्य. महासत्तापदाचे स्वप्न पाहणाऱ्यांनी याचा विचार करायलाच हवा. जागतिक वित्तसंस्थांच्या येण्याचा आनंद असेल तर त्यांच्या जाण्याचा सल मान्य करायला हवा. आरती प्रभुंच्या 'ती येते आणिक जाते'त 'अर्थावाचून उगीच नाही; नाही म्हणते' अशी ओळ आहे. सिटिबँकेच्या जाण्यास ती लागू पडते.

# तडीपार गुंडाला पकडण्यासाठी गेले पोलीस, PSI वर कोयत्याने हल्ला




शासकीय कॅमेरे हलविणाऱ्या तडीपार गुंडाला पकडण्यासाठी गेल्यानंतर त्याने पोलीस उपनिरीक्षकावर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना मंगळवार पेठेत रविवारी सायंकाळी घडली. उपनिरीक्षकाने वार चुकविल्यामुळे ते बचावले. त्यानंतर आरोपींनी पोलिसांवर विटा फेकून मारल्या. या प्रकरणी फरासखाना पोलिसांनी एकाला अटक केली आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार कुमार भागवत चव्हाण (वय २१, रा. मंगळवार पेठ) याला अटक केली आहे. तर, त्याच्या साथीदार प्रतिक पृथ्वीराज कांबळे (रा. मंगळवार पेठ) याचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतिक कांबळे याला तडीपार करण्यात आले आहे. शहरात महत्वाच्या चौकात, गर्दीच्या ठिकाणी नजर ठेवण्यासाठी शासकीय कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मंगळवार पेठेत लावलेले शासकीय कॅमेरे आरोपी व त्याच्या साथीदारांनी हलविल्याची माहिती वाडेवाले यांना मिळाली होती. त्यामुळे ते कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन आरोपींना पकडण्यासाठी गेले होते. त्यावेळी प्रतिक कांबळे याने वाडेवाले यांना 'मला पकडतो का, मी आता तुला जिवंत सोडत नाही, असे म्हणून हातातील कोयत्याने त्यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. पण, वाडेवाले यांनी तो वार चुकविल्यामुळे ते बचावले. त्यावेळी आरोपी कुमार चव्हाण याने वीट उचलून वाडेवाले यांच्याबरोबर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना मारली. त्यांनी कुमार चव्हाण याला पकडले. तोपर्यंत प्रतिक कांबळे हा पळून गेला. फरासखाना पोलिसांनी दोघांवर खुनाचा प्रयत्न करणे व सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# प्रेमासाठी तरुणी मुंबईहून झारखंडला गेली; सोबत लाखो रुपये, दागिने होते, तिथे घडलं भलतंच!

झारखंड: झारखंडमधील गोड्डा येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सोशल नेटवर्किंग साइटवर मैत्री झाल्यानंतर प्रेमसंबंध जुळले. त्यानंतर तरुणी मुंबईहून आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी झारखंडमधील गोड्डा येथे पोहोचली. मात्र, त्याने तरुणीला भरबाजारात मारहाण केली. इतकेच नाही तर, तिच्या पर्समधून जवळपास दीड लाखांची रोकड आणि दागिने हिसकावून पसार झाला. मिळालेल्या माहितीनुसार, प्रियकराला भेटण्यासाठी मुंबईहून तरुणी गोड्डा येथे पोहोचली. तिचे आनंदाने स्वागत करण्याऐवजी तरुणाने तिला भरबाजारात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तरीही ती तरुणी त्याच्यासमोर प्रेम स्वीकारावे यासाठी विनंत्या करू लागली. मात्र, त्याला तिच्यावर दया आली नाही. प्रियकराने तिच्याकडील पर्स हिसकावली. त्यातील दीड



लाख रुपये रोख आणि दागिने लुटून पसार झाला. ही घटना उघड होताच, पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपी प्रियकराला अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून रोकड आणि दागिने हस्तगत केले. पोलिसांनी सांगितले की, प्रियकराने तरुणीला सोशल मीडियावरून प्रेमाच्या जाळ्यात ओढले होते. तरूणी ही मूळची झारखंडच्या सिमडेगा येथील राहणारी आहे. जवळपास तीन वर्षांपूर्वी सोशल मीडिया नेटवर्किंग साइटवर ओळख झाली. त्यानंतर संपर्क क्रमांक दिला. त्यावरून दोघांमध्ये बोलणे सुरू झाले. तरुणी मुंबईत नोकरी करत होती. तरुण मुंबईला गेला. तेथे प्रेमाच्या आणाभाका घेतल्या. तरुणीने त्याला कमावलेल्या पैशांतून त्याला दुचाकी घेऊन दिली. शुक्रवारी तरुणी मुंबईहून पाटणा येथे आली. पाटणा येथून तो तरूण तिला घरी घेऊन गेला. त्यानंतर तेथून तो गोड्डा येथे घेऊन गेला.

तो मूळचा गोड्डा जिल्ह्यातील बेलबड्डा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धोडा गावात राहतो. तिथे गेल्यानंतर तिला घरी घेऊन न जाता तिला भरबाजारात मारहाण केली. तेथील लोकांनी मध्यस्थी करून त्याच्या तावडीतून तरुणीची सुटका केली. त्यानंतर काहींनी फोन केला.

आरोपी तरूण अभिषेक कुमार तेथून फरार झाला. काही तासांनंतर पोलिसांनी आरोपीला पकडले. त्याच्याकडून पैसे जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांनी तरुणीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून, तपास केला जात आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# करोनाबाधित रुग्णाची माहिती लपवली; हलगर्जीपणा करणाऱ्या 2 डॉक्टरांवर गुन्हा



सोलापूर : श्वास घेण्यास त्रास होत असतानाही करोनाबाधित रुग्ण दाखल झाल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनापासून लपवल्याप्रकरणी सोलापुरात खासगी रुग्णालयांतील दोन डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करोनाचा वाढलेला मृत्यूदर ही चिंतेची बाब झाली आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेकडून शहरात मृत्यू होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मृत्यूचे कारण जाणून घेतले जाते. त्याचाच एक भाग म्हणून पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्वतः एका मृत व्यक्तीच्या घरी जाऊन त्या व्यक्तीचा मृत्यू कशामुळे झाला किंवा त्यांना कोणता गंभीर आजार होता का, याची माहिती घेतली. त्यांना संशय आल्याने स्वतः मृत व्यक्तीवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या क्लिनिकला भेट दिली. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सोलापूर शहरातील डॉक्टरांसाठी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन झाले नसल्याचे स्पष्ट झाले. विजापूर रोडवरील शांती नगर येथे राहणारे ८४ वर्षीय रुग्ण १२ एप्रिल रोजी श्वास घेण्यास त्रास होत असल्याने क्लिनिकमध्ये दाखल झाले. तेव्हा डॉ. युवराज माने यांच्या समक्ष जाऊन उपचार घेतले.

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
४
मुंबई, २० ते २६ एप्रिल २०२१

# पुणे-मुंबई महामार्गावर विचित्र अपघात; दोन ठार, भाजपा नगरसेवक बचावले



यशवंतराव चव्हाण पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर चार वाहनांचा विचित्र अपघात झाल्याची घटना घडली. शेडुंग फाट्याजवळ सोमवारी मध्यरात्री झालेल्या अपघातामध्ये दोघांचा मृत्यू झाला, तर तीनजण रुग्णालयात अत्यवस्थ आहेत. स्विफ्ट कारला कंटनेरची, तर मर्सिडिजला आयशरने धडक दिली. मर्सिडिजमधून भाजपाचे नगरसेवक प्रवास करत होते. ते थोडक्यात बचावले. मात्र, त्यांच्यासोबत असलेल्या दोघांचा अपघातात मृत्यू झाला आहे. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर सोमवारी अपघाताच्या दोन घटना घडल्या. पहिल्या घटनेत प्रवाशांना पुण्याहून मुंबईला विमानतळावर सोडण्यासाठी जात असणाऱ्या स्वीफ्ट कारला कंटेनरने जोराची धडक दिली. कंटेरने वेगात असल्याने कारला जवळपास २०० मीटरपर्यंत फरफटत नेलं. सुदैवाने स्विफ्टकारमधून प्रवास करणारे प्रवासी सुखरुप बचावले. तर स्विफ्टचालकाची प्रकृती गंभीर आहे. स्विफ्ट कंटेनर अपघातानंतर लगेच दुसरा अपघात घडला. पनवेलच्या दिशेनं येत असलेल्या मर्सिडीज कारला आयशर टेम्पोने धडक दिली. अपघातग्रस्त मर्सिडीजमध्ये पनवेल पालिकेतील भाजपाचे नगरसेवक तेजस कांडपिळे हे प्रवास करत होते. या मर्सिडीजमधील नगरसेवक कांडपिळे हे सुखरुप असून, इतर दोन जण ठार झाल्याचे समजते. आयआरबी कंपनीच्या अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या पथकाने यावेळी वाहतूक पोलिसांच्या मदतीने इतर प्रवाशांना सुखरुप वाहनांच्या बाहेर काढले. जखमींवर पनवेल येथील अष्टविनायक व एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

पनवेल रुग्णवाहिका असोसिएशनचे अध्यक्ष सुशांत मोहिते (वय २६) व पनवेल महापालिकेतील नगरसेवक तेजस कांडपिळे हे इतर दोन सहकाऱ्यांसह अपघातग्रस्तांना मदतीसाठी थांबले होते.

# लाल रंगातील वाहनांसाठी 'विशेष मार्गिका'



मुंबई : स्वयंघोषित पास योजनेत लाल रंगातील आरोग्य सेवेशी संबंधित वाहनांना प्राधान्य देण्यासाठी मुंबई पोलिसांनी सोमवारपासून ठिकठिकाणी विशेष मार्गिके ची व्यवस्था (ग्रीन कॉरिडॉर) केली आहे. टोल नाके किं वा नाकाबंदीदरम्यान ही वाहने खोळंबू नयेत यासाठी काही ठिकाणी स्वतंत्र मार्गिका आरक्षित के ली होती. तर काही ठिकाणी विरुद्ध दिशेच्या मार्गिके वरूनही वाहने सोडण्यात आली.

मुंबई पोलीस दलाचे सहआयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन रंगांच्या स्वयंघोषित पासपैकी लाल रंगातील वाहनांची वाहतूक विनाअडथळा व्हावी यासाठी प्राधान्याने उपाययोजना के ल्या जात आहेत. शहरात ठिकठिकाणी तेथील वाहतुकीचे प्रमाण, उपलब्ध जागेनुसार लाल रंगातील वाहने सुरळीत पुढे सरकू शकतील या दृष्टीने उपाययोजना करण्यात आली होती. उदाहरणार्थ, सकाळी दक्षिणमुखी म्हणजे मुंबईत येणारी तर संध्याकाळी उत्तरमुखी मुंबईतून बाहेर पडणारी किं वा उत्तर मुंबईच्या दिशेने प्रवास करणारी) वाहने जास्त असतात. हे लक्षात घेऊन सकाळी उत्तरमुखी मार्गिके वरून मुंबईच्या दिशेने लाल रंगातील वाहने जाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती.

मुलुंड, दहिसर, मानखुर्द येथील पाच टोल नाक्यांवर वाहनांची झाडाझडती सुरू आहे. तसेच निर्बंध संपेपर्यंत अनेक ठिकाणी पोलिसांची कायमस्वरूपी नाकाबंदी ठेवण्यात येणार आहे.

मात्र येथेही 'कलर कोड'नुसार वाहनांना मोकळा रस्ता मिळावा, यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. लाल रंगासह पिवळ्या व हिरव्या रंगाचे वर्तुळाकार कागद चिकटवलेली वाहने मार्गिकेच्या मोकळ्या भागातून सोडण्यात आली. या कारवाईदरम्यान काही वाहने विनाकारण रस्त्यावर उतरल्याचे आढळले. तर काही चालक, मालकांनी अत्यावश्यक सेवेशी संबंध नसताना वाहनावर रंगीत कागद चिकटवल्याचेही आढळले. या वाहनांवर कारवाई के ली गेली. 'स्वयंघोषित पास योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यावर कारवाईऐवजी वाहनचालक, मालकाची समजूत काढण्यावर भर असेल. मात्र काही दिवसांनी असे प्रकार आढळल्यास कठोर कारवाई के ली जाईल,' असे पोलीस दलाचे प्रवक्ते चैतन्य एस. यांनी सांगितले. ठाण्याच्या वेशीवर वाहनांची तपासणी ; मुलुंड टोलनाक्यावर वाहतूक कोंडी ठाणे : मुंबई शहरात अत्यावश्यक सेवांशी निगडित वाहने वाहतूक कोंडीमध्ये खोळंबू नयेत यासाठी या वाहनांना लाल, पिवळ्या आणि हिरव्या रंगाचे स्टीकर चिटकविण्याचा निर्णय मुंबई पोलिसांनी घेतला होता. त्यामुळे ठाणे आणि मुंबईच्या वेशीवर असलेल्या मुलुंड टोलनाक्यावर सोमवारी सकाळपासून मुंबई पोलिसांनी वाहनांची तपासणी सुरू केली होती. मात्र, या तपासणीमुळे मुलुंड टोलनाका परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. अवघ्या १० मिनिटांचे अंतर गाठण्यासाठी वाहनचालकांना अर्धा तास लागत होता.

# प्रशिक्षणार्थी डॉक्टर, 18 हजार रुपयांना एक रेमडेसिव्हिर इंजेक्शन विकायचा; 'अशी' केली अटक



एकीकडे जिल्ह्यात रोज करोनाबाधितांची संख्या वाढत आहे. दुसरीकडे रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा प्रचंड तुटवडा भासत असताना, त्याचा काळाबाजार करणाऱ्या दोघांना पोलिसांनी छापा टाकून अटक केली. यातील तिघे फरार असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा प्रचंड तुटवडा भासत आहे. गेले काही दिवस रोज चारशे ते पाचशे करोनाबाधित रुग्ण आढळत आहेत. त्यामुळे रोज दीड हजारांवर इंजेक्शनची गरज असताना प्रत्यक्षात मात्र पुरवठा अतिशय कमी आहे. मिळेल त्या किंमतीत सध्या नातेवाइक हे इंजेक्शन मिळवत आहेत. पण काही ठिकाणी या इंजेक्शनचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्यांनी छापा टाकून दोघांना अटक केली आहे.

# तरुणाची बेदम मारहाण करुन हत्या, अनैतिक संबंधांचा संशय



बाडमेर: राजस्थानमधील बाडमेरमध्ये खळबळजनक घटना घडली. एका तरुणाची बेदम मारहाणीत हत्या करण्यात आली. बाखासार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साता गावात ही घटना घडली. पोलिसांनी मृताच्या कुटुंबीयांच्या तक्रारीवरून हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. अनैतिक संबंधांच्या संशयावरून तरुणाची हत्या करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई करून चार जणांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाखासर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साता गावात जुम्मे खां या तरुणाची हत्या करण्यात आली. तो रामसर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील रहिवासी होता. या घटनेची माहिती मिळताच बाडमेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन सेडवा रुग्णालयात विच्छेदनासाठी नेण्यात आला. रुग्णालयाबाहेर मोठा जमाव होता. काही वेळ तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे सेडवा, चोहटन आणि बाखासर येथील वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करतानाच, चार जणांना या प्रकरणात अटक केली. या तरुणाची अनैतिक संबंधांतून हत्या झाल्याचे बोलले जाते. सेडवा येथील महिलेशी त्याचे अनैतिक संबंध होते. तो महिलेला भेटायला आला होता. त्याची माहिती तिच्या कुटुंबीयांना मिळाली. त्यांनी या तरुणाला बेदम मारहाण केली.

# मानसिक संतुलन बिघडलेल्या युवकाने कुऱ्हाडीने केली दोघांची हत्या; सहा गंभीर

बहिणीचे लग्न ठरल्याने चर्चेसाठी आलेल्या मामा व काकावर झोपेतच युवकाने कुऱ्हाडीने घाव घालत संपविले. तर घरात झोपलेल्या आई-बहिणीसह अंगणात झोपलेल्या चार शेजाऱ्यांना मानसिक संतुलन बिघडलेल्या युवकाने कुऱ्हाडीने वार करीत गंभीर जखमी केले. सोमवारी रात्री घडलेल्या या घटनेने पुसद तालुक्यातील कार्ला तांड्यात थरकाप उडाला आहे. मेरचंद शामा आडे (वय ६५) रा. उपवनवाडी व वसराम जेता राठोड (वय ५५) रा. कार्ला तांडा असे मृतकांचे नाव आहे. तर गोकुळ विलास राठोड (वय २४) असे आरोपी युवकाचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्यामध्ये आई सुनिता विलास राठोड (वय ४५) बहीण अश्विनी विलास राठोड (वय १८), चुलत काका संजय जेता राठोड (वय ३५), शेजारी गणेश आनंदा जाधव(वय ५०),यशोदा गणेश जाधव (वय ४५) व नामदेव भाऊ राठोड (वय ३४) यांचा समावेश आहे. जखमींवर यवतमाळ येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# बियरच्या बाटल्या डोक्यात फोडून युवकाचा खून; आरोपीला पोलिस कोठडी



बियरच्या बाटल्या डोक्यात फोडून खून केल्यावर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह प्लस व्हॅलीच्या दरीत फेकून दिल्याप्रकरणी पौड पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीला २२ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश कोर्टाने दिला.

सागर खोपडे (वय २९) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात आधी एकाला अटक करण्यात आली असून, त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. दीपक चव्हाण (वय ३३) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी ३१ वर्षांच्या व्यक्तीने तक्रार दिली आहे. पुणे-माणगाव रस्त्यावरील प्लस व्हॅलीच्या परिसरात चार एप्रिल रोजी ही घटना घडली. दीपक आणि सागरमध्ये वाद झाला.

# विमा काढण्याच्या बहाण्याने फसवणूक




विमा पॉलिसी काढून देण्याच्या बहाण्याने एका एजंटने एपीएमसीतील वाहतूक व्यावसायिकासह चौघांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नरेंद्र पाल असे या विमा एजंटचे नाव असून एपीएमसी पोलिसांनी त्याच्यावर फसवणुकीसह अपहार तसेच बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार पंकज जोईसर यांचा एपीएमसीमध्ये वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे १० गाड्या आहेत. काही महिन्यांपूर्वी जोईसर यांची विमा एजंट नरेंद्र पाल याच्याशी ओळख झाली होती. त्यामुळे जानेवारीमध्ये जोईसर यांनी त्यांच्या दोन वाहनांचा विमा काढण्यास पाल याला सांगितले होते. त्यावेळी पाल याने दोन वाहनांचा रिलायन्स विमा कंपनीचा विमा काढून देण्यासाठी ८३ हजार ५१८ रुपये होतील, असे सांगितले होते. त्यानुसार जोईसर यांनी त्याला चेक दिल्यानंतर पाल याने स्वत: चेकवर रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीचे नाव लिहिले होते. त्यावेळी जोईसर यांनी ओळखीतील तीन व्यक्तींच्या विम्याचे कामदेखील पाल याला दिले होते. जोईसर यांनी दिलेला चेक पाल याच्या खात्यात वळते झाल्याचा मेसेज त्यांच्या मोबाइलवर आल्यानंतर त्यांनी पाल याला फोन केला. मात्र त्याने बाहेर असल्याचे सांगून फोन कट केला. त्यानंतर एजंट पाल याने जोईसर यांना रिलायन्स कंपनीच्या इन्शुरन्स पॉलिसीची कागदपत्रे ईमेलद्वारे पाठवून दिली. या पॉलिसीच्या कागदपत्रांची जोईसर यांनी तपासणी केली असता, ते बनावट असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यानंतर जोईसर यांनी पाल याला अनेकवेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने जोईसर यांचे फोन घेतले नाही. तसेच, पाल याने जोईसर यांच्या ओळखीतील मारुती माने, याकुब शेख, प्रवीण जाधव यांचीदेखील अशाच पद्धतीने फसवणूक केल्याचे त्यांना समजले.

एजंट पाल याने विमा काढण्यासाठी दिलेल्या चेकमध्ये फेरफार करून हा चेक स्वत:च्या खात्यावर वळता करून फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर जोईसर यांनी एपीएमसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# अवैध दारु वाहतूक करणाऱ्या दोन तोतया पत्रकारांना अटक



औरंगाबाद, एका हिंदी दैनिकाचा पत्रकार असल्याचा आव आणून विदेशी दारूची चोरटी वाहतूक केल्याप्रकरणी पोलिसांनी दोघा तोतया पत्रकारांना अटक केली आहे. पुष्कर रामचंद्र आहेरकर (वय २४) आणि किशन राजु कुंडारे (वय २३, दोघे रा. पहाडसिंगपूरा) अशी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्या विरोधात बेगमपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे यांना बेगमपुरा परिसरात काही जण विदेशी दारूची अवैध वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी या माहितीच्या आधारे बीबी का मकबरा परिसराजवळ सापळा रचला. तेथे रस्त्याकडेला थांबलेल्या एक दुचाकीवर संशय आल्याने पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले. त्यांची तपासणी केली असता, विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी पोलिसांनी दारूसह दुचाकी असा एकूण ६२ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जाप्त केला आहे. यातील पुष्कर आहेरकर याच्या जवळून एका हिंदी दैनिकाचे आयकार्ड जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे यांच्यासह संतोष सोनवणे, चंद्रकांत गवळी, भगवान शिलोटे, विशाल पाटील, आनंद वाहुळ, रितेश जाधव यांनी केली. पोलिसांनी पकडताच आरडाओरडा विदेशी दारूसह पुष्कर आहेरकर याला ताब्यात घेताच, 'मी पत्रकार आहे. तुम्ही अशी बेकायदेशीर कारवाई कशी करता,' असा आरोप करून आहेरकर याने पोलिसांना धमकाविण्याचा प्रयत्न केला. तसेच, आरडाओरडा केला. विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी सक्तमजुरी

औरंगाबाद : 'कपड्याचे दुकान टाकण्यासाठी माहेरहून दोन लाख रुपये घेऊन ये,' अशी मागणी करून विवाहितेचा छळ करण्यात आला. सततच्या छळाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली. या प्रकरणी न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी दहा वर्षे सक्तमजुरी आणि विविध कलमांखाली प्रत्येकी ३५ हजार याप्रमाणे एकूण एक लाख पाच हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. भिष्मा यांनी हा निकाल दिला. राणी पाचपुते (वय २०) असे मृत विवाहितेचे नाव आहे. तिचा पती रामेश्वर पाचपुते (वय ३०), सासरा दत्तू पाचपुते (वय ६०) आणि सासू भीष्माबाई पाचपुते (वय ५५, सर्व रा. जळगाव मेटे, ता. फुलंब्री) अशी आरोपींची नावे आहेत.

# ज्येष्ठ नागरिकाला पावणेदोन लाखांचा गंडा

नरवीर तानाजी मालुसरे रस्ता परिसरातील एका ज्येष्ठ नागरिकाला त्यांचे क्रेडिट कार्ड बंद होणार असल्याचे सांगून कार्डाची माहिती घेऊन एक लाख ८६ हजारांचा ऑनलाइन गंडा घालण्यात आला. या प्रकरणी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रवींद्रनाथ कुरलेक (वय ७६) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीच्या विरोधात आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नऊ नोव्हेंबर २०२० मध्ये नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील आनंदनगरमध्ये ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्रनाथ आनंदनगरमध्ये राहतात. नऊ नोव्हेंबर रोजी त्यांना एका व्यक्तीने फोन करून बँक ऑफ बडोदामधून बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्या व्यक्तीने त्यांना 'तुमचे क्रेडिट कार्ड बंद होणार आहे,'असे सांगितले आणि रवींद्रनाथ यांच्या बँक खात्याची सर्व माहिती विचारून घेतली.

# घृणास्पद! अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन सामूहिक बलात्कार, अश्लील व्हिडिओ काढला



बाडमेर: राजस्थानमधील बाडमेरमधील शिव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात संतापजनक घटना घडली आहे. एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. त्यानंतर या दुष्कृत्याचा व्हिडिओही काढून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला. पीडितेच्या भावाने या प्रकरणी तक्रार केली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेच्या भावाने शिव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. गावातीलच दोघांनी त्याच्या अल्पवयीन बहिणीचे अपहरण केले. त्यानंतर गावाजवळील जंगल परिसरात नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. त्यानंतर तिचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढले, असे त्याने तक्रारीत नमूद केले आहे. या घटनेची कुठे वाच्यता केली तर तिच्यासह कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकीही आरोपींनी दिली. अल्पवयीन मुलीचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांना या घटनेची माहिती मिळाली. पीडितेला घेऊन तिचा भाऊ पोलीस ठाण्यात गेला. तिथे त्यांनी गावातील दोघांविरोधात तक्रार दाखल केली. शिव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या घटनेचा तपास पोलीस उपअधीक्षकांकडे देण्यात आला. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या घटनेचा तपास करून सत्य समोर आणले जाईल, असे पोलीस उपअधीक्षकांनी सांगितले.

पीडितेच्या भावाने शिव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास सुरू केला आहे. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पीडितेची वैद्यकीय तपासणी केली जात आहे. बाडमेर पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, चौकशी सुरू केली आहे. पोलीस उपअधीक्षकांनी घटनास्थळी जाऊन पीडितेचा जबाब नोंदवून घेतला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898